## महत्त्वाच्या सूचना:

कार्यशाळेला सकाळी १० पर्यंत पोचावे. दुसऱ्या दिवशी दु. ३ वाजता कार्यशाळा संपेल. कार्यशाळेसाठी नोंदणी करताना मागणी झाल्यास शक्य तर सशुल्क वाहन व्यवस्था उपलब्ध करायचा प्रयत्न असेल. लोणावळा रेल्वे स्टेशनपासून चाकण पर्यंत व परत लोणावळ्यापर्यंत व्यवस्था असेल.

**एरवी प्रवास कसा कराल?:** मुंबईहून तळेगाव मार्गे चाकणला येता येईल. पुणे स्टेशनहून स्थानिक बसने आणि शिवाजी नगर येथून एस.टी. बसने चाकणला आंबेठाण चौकात यावे. एस.टी. स्थानक (२ किमी) अथवा आंबेठाण चौक (१ किमी) येथून चालत / स्वतंत्र रिक्षाने येता येईल. (गुगल मॅपवर मनशक्ती चाकण पहा.)

पुणे / मुंबईहून चाकण-नाशिक रस्त्यावर आंबेठाण चौक आहे. त्या चौकात उजवीकडे म्हणजेच पूर्वेकडे वळा. तो रस्ता संपल्यावर डावीकडे वळा. उजवीकडे ओम स्वीट्स दुकान दिसेल. तेथे आगरवाडी रस्त्यावर उजवीकडे वळा. सुमारे ५०० मीटर अंतरावर मनशक्ती केंद्र आहे.

एसटी स्थानकावरून नगर परिषदेकडे जाणाऱ्या रस्त्याने आनंद हॉस्पिटलपर्यंत या. पुढे उजवीकडे ओम स्वीट्स दुकान दिसेल. तेथे आगरवाडी रस्त्यावर उजवीकडे वळा. सुमारे ५०० मीटर अंतरावर मनशक्ती केंद्र आहे.

**काय आणाल?:** दंतमंजन, ब्रश, तेल, कंगवा, साबण, चप्पल, टॉवेल, रुमाल, सर्व प्रकारचे कपडे, आवश्यक तर औषधे.

**काय टाळाल?:** मौल्यवान वस्तू, कॅमेरा, अंगठी-चेन इ. दागिने, इ. [वही-पेन, निवास साहित्य (गादी, बेडशीट, चादर) दिले जाईल.]

### अन्य सूचना:

- जाचक नसले तरी सर्वांच्या सोयीसाठी शिबिराचे काही नियम आहेत.
- स्वावलंबन, नीटनेटकेपणा, शिस्त यासाठी स्वच्छता, भोजन वाटप यासारखी कामे मर्यादित प्रमाणात मुला-मुलींनी करायची आहेत.
- निवास व्यवस्था साधी पण स्वच्छ असेल.
- भोजन साधे, शाकाहारी पण रुचकर असेल.
- मांसाहार, धूम्र/मद्यपान संस्थेच्या परिसरात वर्ज्य आहेत.
- कार्यशाळेत सहभागी होणाऱ्यांचा पेहराव प्रशिक्षणाला साजेसा असावा.
- मोबाईलचा वापर कार्यशाळेच्या काळात करणे अपेक्षित नाही.

चाकण गावातील मुलामुलींना विशेष सवलत

**उठा! सगळे मिळून या देशाचे भाग्य सजवू!!**